# महाराष्ट्र शासन
## माहिती व जनसंपर्क महासंचालनालय अधिपत्याखालील
महाराष्ट्र परिचय केंद्र, पणजी, गोवा.
## जाहिरात क्रमांक १/२००९-१०

महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र परिचय केंद्र, पणजी, गोवा कार्यालयातील ग्रंथपाल या रिक्त पदासाठी पात्र उमेदवाराकडून विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहे. भरावयाच्या पदाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पद/संवर्ग | वेतनश्रेणी | तपशिल | एकूण पदसंख्या |
|---|---|---|---|---|
| १ | ग्रंथपाल, गट- क | रु. ५२००-२०२०० (पीबी १) | १ (खुला) | १ |

२. वरील पदासाठी मराठी व इंग्रजी भाषेचे चांगले ज्ञान अवगत असावे. उपरोक्त पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी संगणक विषयक अतिरिक्त आवश्यक अर्हता म्हणून DOEACC सोसायटीच्या अधिकृत CCC किंवा O स्तर किंवा Aस्तर किंवा B स्तर किंवा C स्तर पैकी एक परीक्षा उत्तीर्ण करणे किंवा MS-CIT परीक्षा नेमणूक झाल्यापासून ६ महिन्याच्या आत उत्तीर्ण करणे उमेदवारावर बंधनकारक राहील.

३. वय, शैक्षणिक, अनुभव व इतर आवश्यक/प्राधान्य देण्यासाठी यथास्थिती अर्हता :

| अ. क्र. | पद | वयोमर्यादा | किमान शैक्षणिक अर्हता | अनुभव | इतर अर्हता/प्राधान्य देण्यासाठी अर्हता( काही असल्यास) |
|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रंथपाल गट-क | किमान १८ वर्षे कमाल ३३ वर्षे | संविधिक विद्यापीठाची पदवी आणि संविधिक विद्यापीठाची ग्रंथपालन पदवी किंवा पदविका | २ वर्षाचा ग्रंथपाल पदाचा मान्यता प्राप्त शासन नोंदणीकृत ग्रंथालयातील ग्रंथपाल पदाचा अनुभव | सुव्यवस्थित ग्रंथालयातील कामाचा अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. निवड झालेल्या उमेदवाराचा २ वर्षाचा परिविक्षा कालावधी राहील. |

**४. अर्ज कसा करावा :**

(१) अर्जदार हा महाराष्ट्र किंवा गोवा राज्याचा रहिवासी असावा. (डोमिसाईल प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक). अर्जदाराकडे महाराष्ट्र किंवा गोवा राज्याचा रहिवासी असल्याचे शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

(२) खुल्या प्रवर्गातील उन्नत व प्रगत/कुटुंबातील (क्रिमीलेअर) महिला सदस्यांना, महिलांचे ३० टक्के आरक्षण अनुज्ञेय नाही. यास्तव महिला उमेदवारांनी त्या क्रिमीलेअरमध्ये मोडतात किंवा नाही हे अर्जात स्पष्टपणे नमूद करावे. तसेच उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र मुलाखतीच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

(३) उमेदवाराने सोबत दिलेल्या विहित नमुन्यात ३० से.मी. X २० सें.मी. आकाराच्या पाढऱ्या जाड कागदावर एकाच बाजूला हस्तलिखित/टंकलिखित वा चक्रमुद्रीत करुन अर्ज करावा.

(४) उमेदवारानी अर्जातील माहिती/तपशिल सुस्पष्टपणे नमूद करावा.

(५) उमेदवाराने ओळखपत्रावरील छायाचित्राच्या आकाराचे त्याचे अलिकडचे छायाचित्र आवेदनपत्रावर विहित जागी घट्ट चिकटवावे व त्यावर उमेदवाराने स्वत:ची स्वाक्षरी करावी.

(६) खुल्या प्रवर्गातील उमेदवाराने अर्जासोबत रु.२००/- व मागासवर्गीय उमेदवाराने अर्जासोबत रु. १००/- इतक्या रकमेचे कोर्ट फी स्टॅम्प लावण्यात यावेत.

कृपया पान २ वर पहा . . .

(७) शैक्षणिक अर्हतेबाबत सर्व कागदपत्राच्या साक्षांकित छायांकित झेरॉक्स प्रती, जन्मतारखेसाठी माध्यमिक शालांत परीक्षेचे प्रमाणपत्र, एस.एस.सी./एच.एस.सी/पदवी/पदविका(गुणपत्रिका व सनद) इत्यादी तसेच अनुभव प्रमाणपत्र, खुल्या प्रवर्गातील महिला तसेच क्रिमिलेअरचे प्रमाणपत्र लागू असेल त्यांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सध्या वैध असलेले सक्षम प्राधिकाऱ्याच्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत अर्जासोबत जोडावी.

(८) प्रमाणपत्राच्या मूळ प्रती अर्जासोबत जोडू नयेत.

(९) शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००-१२, दिनांक १.७.२००५ अन्वये दोन पेक्षा अधिक मुले हयात असणारे उमेदवार शासन सेवेत नियुक्तीस पात्र नाहीत. लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र आवश्यक (अर्जाच्या नमुन्यासोबत प्रमाणपत्राचा नमुना जोडलेला आहे) प्रमाणपत्र साक्षांकित नसलेस अर्ज फेटाळण्यात येईल.

(१०) उमेदवारांनी शैक्षणिक पात्रता, जातीचा दाखला, जातीचे वैधता प्रमाणपत्र (असल्यास) व अनुभवाच्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रतीसह विहित नमुन्यामध्ये भरुन पाठविलेली आवेदनपत्र आवश्यक त्या रक्कमेच कोर्ट फी स्टॅम्प लावून वरिष्ठ सहाय्यक संचालक, महाराष्ट्र परिचय केंद्र, महाराष्ट्र शासन, डॉ. दादा वैद्य मार्ग, पणजी,गोवा ४०३ ००१ यांच्याकडे दिनांक १४ जुलै २००९ रोजी किंवा तत्पूर्वी पोहाचतील अशा बेताने पाठवावीत. अर्ज पाठवितांना बाहेरील लिफाफ्यावर ज्या पदासाठी अर्ज केलेला आहे त्या पदाचा उल्लेख करुन त्या साठी अर्ज असे स्पष्ट लिहावे. या तारखेनंतर मिळालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

(११) उमेदवारांनी आपले अर्ज वरील मुदतीत शक्यतो नोंदणीकृत डाकेने/पोच देय डाक नोंद टपालाने पाठवावेत व त्या टपालाची पावती जतन करावी. टपाल खात्याची दिरंगाई व अन्य कोणतेही कारण असो, कोणत्याही परिस्थितीमध्ये वरील कालमर्यादा काटेकोरपणे पाळली जाईल आणि त्या करीता अर्ज भरुन पाठविणे याबाबतीत उमेदवारांनी अत्यंत तत्परतेने पूर्तता करणे हे त्यांच्या हिताचे राहील.

(१२) शासकीय/निम शासकीय सेवेतील कर्मचाऱ्यानी त्यांचे अर्ज त्यांच्या वरिष्ठामार्फत पाठवावेत. शासकीय/निम शासकीय सेवेतील कर्मचाऱ्यानी त्यांच्या वरिष्ठामार्फत न पाठविलेले अर्ज अपात्र ठरविण्यात येतील. अशा कर्मचाऱ्यांची नेमणूक झाल्यास मूळ सेवेतील अधिकाऱ्याचे ना हरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. ना हरकत प्रमाणपत्राशिवाय नेमणूक आदेश दिले जाणार नाहीत.

(१३) उमेदवारांनी त्यांच्या उमेदवारीच्या संबंधात कोणत्याही प्रकारे दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्याची उमेदवारी अपात्र ठरविली जाईल.

(१४) आवश्यकतेनूसार आयोजित केलेल्या लेखी परीक्षेस किंवा मुलाखतीसाठी प्रवासखर्च किंवा इतर खर्च दिला जाणार नाही.

(१५) शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक अंनियो १००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१ ऑक्टोबर २००५ अन्वये शासन सेवेत दिनांक ०१ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी "परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना " लागू राहिल.

(१६) वरील पदावर शासन सेवेत नियुक्त होणारा उमेदवार महाराष्ट्रात तसेच महाराष्ट्राबाहेर माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या अधिनस्त कार्यालयात बदली योग्य राहील.

(१७) एखादा किंवा सर्व अर्ज फेटाळण्याचा किंवा जाहिरात रद्द करण्याचा अधिकार शासनाने राखून ठेवला आहे.

वरिष्ठ सहाय्यक संचालक,<br>
महाराष्ट्र परिचय केंद्र,<br>
पणजी-गोवा.

# अर्जाचा नमुना

| उमेदवाराने स्वत:चे अलीकडील छायाचित्र येथे चिकटवावे |
|---|

**प्रति,**
**मा.वरिष्ठ सहाय्यक संचालक,**
**महाराष्ट्र परिचय केंद्र,**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,**
**महाराष्ट्र शासन, डॉ. दादा वैद्य मार्ग,**
**पणजी-गोवा ४०३ ००१.**

**विषय :- ग्रंथपाल पदासाठी अर्ज**

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | उमेदवाराचे नाव | आडनाव | | स्वत:चे नांव | | वडिलांचे/पतीचे नांव | | | |
| २ | जन्मतारीख | दिनांक | | महिना | | वर्ष | | | |
| ३ | जाहिरात प्रसिध्दीच्या दिनांकास असलेले वय | वर्षे | | महिने | | दिवस | | | |
| ४ | जात | | | | | | | | |
| ५ | जाती विषयक वर्गवारी (आवश्यक त्या रकान्यात चिन्हाची √ खूण करावी) | खुला | अ.जा. | अ.ज | वि.ज. (अ) | वि.मा.प्र | भ.ज. (क) | भ.ज(ड) | इ.मा.व. |
| ६ | कोणत्या समांतर आरक्षणासाठी अर्ज केला आहे त्या रकान्यात चिन्हाची √ खूण करावी | माजी सैनिक | प्रकल्पग्रस्त | | अपंग | महिला | खेळाडू | | |
| ७ | शैक्षणिक अर्हता | परिक्षेत मिळालेली टक्केवारी | | | | उत्तीर्णतेचे वर्ष | | | |
| अ | पदवी | | | | | | | | |
| ब | ग्रंथपालन पदवी/पदविका | | | | | | | | |
| क | शालांत | | | | | | | | |
| ८ | उपरोक्त नमूद अर्हतेशिवाय इतर अर्हतेचा तपशिल | | | | | | | | |
| ९ | सेवायोजना कार्यालयाचा नोंदणी क्रमांक | | | | | | | | |
| १० | उमेदवाराचा पूर्ण पत्ता | | | | | | | | |

**प्रमाणपत्र**

मी असे प्रमाणित करतो/करते की, प्रस्तुत पदाच्या जाहिरातीतील अटी, शर्तीसंबंधी सूचना मी काळजीपूर्वक वाचल्या आणि मला समजल्या असून त्यानुसार मी सदरहू पदासाठी पात्र असल्याची खात्री आहे. तसेच आवेदन पत्रात दिलेली माहिती बरोबर व खरी आहे. या अर्जात दिलेली माहिती खोटी असल्यास पुढील योग्य त्या कार्यवाहीस मी पात्र राहील तसेच अर्जातील बाबी परिपूर्ण नसल्यास आणि अर्जासोबत आवश्यक प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती नसल्यास माझा अर्ज नाकारण्यात येईल व याबाबत मला काहीही कळविण्यात येणार नाही याची मला जाणिव असल्याने याबाबत कोणताही आक्षेप राहणार नाही.

दिनांक :- उमेदवाराची स्वाक्षरी

---

**प्रतिज्ञापत्र**

मी श्री/श्रीमती/कुमारी------------------------------------------------------------ श्री.------------------------------------------ ----यांचा/यांची/मुलगा/मुलगी/पत्नी, वय----------वर्षे राहणार ----------------------------यावदारे पुढील प्रमाणे असे जाहीर करतो/करते की, १) मी ------------------------------- या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे. २) आज रोजी मला---------------(संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ या नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या----------- आहे. (असल्यास, जन्म दिनांक नमुद करावा). ३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या, मुलामुळे या पदासाठी मी अपात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाणी :-
दिनांक :-

सही/-